ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# जात आणि लिंग विषमता

डॉ. प्रशांत रामदासजी राऊत
सहायक प्राध्यापक नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि
श्रीमती म.ह.वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड

## जातीय विषमता

जगामध्ये भारत हा असा एकमेव देश आहे की, जिथे अठरा पगड जाती आहे, जातीची विविधता आहे किंबहुना पोट जाती अगणित आहे. 'दर बारा कोसावर एक जात बदलते' हे जे म्हटल्या जाते ते खरे आहे. जातीच्या निर्मितीचे मुळ कारण हे वर्ण व्यवस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जेव्हा या पृथ्वीचा जन्म झाला तेव्हा पाणी पुढे वनस्पती व कालांतराने माणूस अशी साखळी आपल्याला दिसते. माणूस आदीम अवस्थेत असताना पासून त्याची पुढे उत्तरोत्तर सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक प्रगतीं होताना समुदायाची निर्मिती किंवा गटाची निर्मिती झाली. तो शिल्पकाम, मूर्तिकाम, लोखंडकाम, सुतारकाम इत्यादी कामे करू लागला व त्या कामात प्रावीण्य मिळवू लागला. ही सर्व माणसे एकाच धरतीवर एकच वेषभूशा असलेली व एकच जीवन शैलीत वावरणारी त्यांच्या काम करण्याच्या भूमिकेमुळे थोडी वेगवेगळी दिसायला लागली व कालांतराने पुढे लोक त्यांना त्यांच्या कामावरून ओळखू लागले आणि संबोधित करू लागले व जातीचा उगम झाला आणि वर्ण व्यवस्थेने हे काम अजूनच दृष्ट केले. एवढे दृष्ट केले की, आज जातीला जा म्हटले तरी ती जात नाही. ती जात जन्मापासून मृत्यु पर्यंत व्यक्तीला चिकटून राहते.

जातीची उत्पत्ती पाहताना 'जन' या धातुपासून जात निर्माण झाली. अर्थात हा शब्द 'जें' या पोर्तुगीज शब्दापासून तयार झाल्याचे मानले जाते. जातीव्यवस्थेचा विचार करता प्राचीन काळापासूनचे अस्तित्व मान्य करावे लागेल. आपल्या ऋग्वेदात म्हटल्या प्रमाणे अर्थात ब्राहमण मुखातून, क्षत्रीय वाहुतून, वैष्य जांघेतून तर शुद्र पायातून जन्मास आल्याचे म्हटले जाते. ह्या कडक निर्बधाने जातीची उतरंड निर्माण केली. वर्ण व्यवस्थेमूळे ब्राहमण, क्षत्रिय, वैष्य आणि शुद्र असे चार स्तर निर्माण झाले व त्यात जातीची विभागणी झाली. तेथूनच जातीय विशमतेला सुरूवात झाली. आज जो तो जाती नूसारच परस्परांशी वागताना, बोलताना व जगताना दिसतोय. जाती विशमतेने एवढा उंच कळस गाठला की, लोक सुरूवाती पासून बोलणाऱ्याची जात माहीत करून घेण्याचा प्रयत्न करतात व त्या नुसारच बोलणाऱ्याची जात माहीत करून घेण्याचा प्रयत्न करतात व त्यानुसारच त्याच्याशी भलेबुरे वागण्याचा निश्चय करतात किंबहुना आडनावा वरून जात कळली नाही तर आईकडील, मामाकडील माहिति विचारून जातीपर्यत पोचण्याचा दुराग्रह करतात व नंतरच पुढचे पाउल टाकतात एवढी जातीय विशमता नव्हे तर किळस येईल अशा भावना आज समाजात फोफावताना दिसतात. जात ही जन्माने मिळते, ती कर्माने मिळत नाही ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. कदाचित युरोप खंडातील देशांपेक्षा भारत दोनशे वर्षांनी मागे राहण्याचे हेही एक कारण आहे.

जातीमुळे प्रत्येकजण एकमेकांषी स्वतःच्या जातीचा दाखला देत कनिष्ठ-वरिष्ठ भावनेने वागण्यात लोकांना धन्यता वाटते याचे आश्चर्य वाटते. जातीची निर्मिती, वर्ण व्यवस्था, धर्मकारण आणि हुकूमशाही वृत्ती या सर्वामुळे माणसा-माणसांना एकमेकांशी माणूसकीने न वागायला शिकवून, वचकून व हटकून वागण्याचे जे अयोग्य संस्कार लोकांच्या हृदयात व मेंदूत पेरल्या गेले हे त्याचे मूळ कारण आहे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

आज आंतर जातीय विवाहामुळे व शिक्षणाची गंगा घरोघरी वाहत असल्यामुळे जातीभेद किंचितसा कमी झाला आहे. अस्पृश्यता जरी कमी झाली असली तरी ती पूर्णपणे नष्ट झाली असे मात्र ठामपणे म्हणता येत नाही तर अस्पृश्यतेचे स्वरूप बदलले असे म्हणावे लागेल. भारतात जरी लोकशाही असली तरी सत्ता जर हिंदुत्ववादी असेल तर जातीभेदाचे निर्मूलन न होता उलट त्याला खतपाणी मिळेल हेही विसरता येत नाही. संविधानाच्या निर्मिती नंतर संविधानाच्याच कलम 17 नूसार अस्पृश्यता, जातीय भेदभाव नष्ट करण्यात आले आणि संविधानाच्या सरनाम्यात मानवी मूल्यांचा स्वीकार करण्यात आला परंतु आज 21 व्या शतकात भारताने विकासाची कास धरलेली असताना जातीय दंगे घडताना दिसत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हु वेअर दि शुद्राज' आणि 'ॲनिहिलेषन ऑफ कास्ट' या ग्रंथाच्या माध्यमातून जाती प्रथे विषयी विचार मांडले. त्यात त्यांनी जातीला कोणताही शास्त्रीय आधार नाही. जाती व्यवस्था ही श्रमाची नव्हे तर श्रमिकांची विभागणी असल्याची ठाम मांडणी केली आहे. जातीच्या उच्चाटनासाठी धर्माची वस्तुनिष्ट व वैज्ञानिक चिकित्सा करून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देउन व्यापक लोक जागृती बरोबरच उत्पादन व उत्पन्नाच्या संसाधनात समान फेरवाटप करने आवश्यक आहे असे सूत्र मांडले.सर्वात जास्त या जाती विषमतेचा परिणाम वा फटका कोणाला बसला असेल तर तो शुद्रांना. शुद्र वर्ण तर या परिस्थितीत अगदीच चिरडला गेला. त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी निम्नकोटीची होऊ लागली. शुद्रांनी वेद वाचू नयेत, वेद ऐकू नयेत, वरच्या तीन्ही वर्णांशी रोटी-बेटी व्यवहार करू नयेत असे नानाविध कठोर नियम शुद्रांसाठी बनविण्यात आले. या जातीबध्द समाज रचनेची प्रक्रियाच अशी झाली की, त्यातून समाज शतषः भिन्नभिन्न व्यवसाय गटात विभागला गेला. माणसा-माणसातील भेदाने समाजाच्या हजारो चिरफळया झाल्या. अत्यंत शुध्द आणि अंत्यत अशुध्द अशी समाजाची ब्राहमण आणि अस्पृष्य यांच्यात अतिरेकी विभागणी करण्यात आली.

आपण आज जाती-जातीतील व्यवहारांना महत्व देत आहोत यामुळे वैचारिकता मागे पडत आहे परंतु जाती निर्मूलनासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे. यासाठी परंपरागत व्यवस्थेशी वैचारिक संघर्ष करावा लागेल तरच बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय यावर आधारित समाज निर्माण होईल. जातीमुक्त समाज व्यवस्था हीच मानव मुक्ती आणि शोशितांच्या उज्वल जीवनाची व्यवस्था असेल. पुरोगामी महाराष्ट्रात जाती पातीमधील भेद काही प्रमाणात कमी होत असताना सरकारकडून जाती व्यवस्था अधिक दृष्ट् करण्याचा प्रयत्न होत आहे. राज्याच्या शालेय शिक्षण खात्याने 2017 च्या चालू सत्रापासून शाळकरी मुलामुलींना शाळा सोडण्याच्या प्रमाण पत्रावर जात आणि धर्मासोबत पोटजातही नमूद करने सक्तीचे केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचा फार खोलपर्यंत जाउन अभ्यास केला. या अभ्यासाच्या आधारावर त्यांनी जातीची राजकीय, धार्मीक आणि आर्थिक समस्या मांडली. जातीमुळे भारतीय समाजाचे, देशाचे जे नूकसान झाले ते केवळ काही जातींच्या आपल्या स्वार्थामुळे झालेले आहे. ज्यामुळे या देशाच्या विकासामध्ये जाती या अडथळा निर्माण करणाऱ्या म्हणून आंबेडकर म्हणतात की या जातीच्या राक्षसाचा विनाश केल्या शिवाय लोकांमध्ये कोणत्याही सुधारणा होणे शक्य नाही. डॉ. आंबेडकर यांच्या मते 'हे एक राष्ट्रीय कार्य आहे'

### लिंग विशमता

प्राचीन काळापासूनच आजतागायत लिंग विषमता आढळते. पुरूशांनी कठोर मेहनतीचे जड कामे करत त्यांच्या जीवनाची वाटचाल सुरू केली. स्त्री ही नाजूक, कोमल, मऊ मनाची व मऊ हृदयाची ईश्वराची सौंदय 'निर्मिती आहे असा अलिखित नियम पुरूशांनी स्वीकारला व तेथूनच लिंग विषमतेचा जन्म झाला. दुसरे महत्वाचे कारण स्त्रीमध्ये आई होण्याची किंवा तीच्यातील

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

गर्भधारणक्षमता होय. ती प्रत्येक काम करू शकत नाही, तिने तिचेच काम करावे हे अत्यंत जाणीव पूर्वक तिच्या मनावर ठरविण्यात आले.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया मोठ्या प्रमाणात अग्रेसर झाल्या. या सर्वच स्त्रियांचे जीवनानुभव मराठी स्त्री साहित्यात उमटलेले दिसून येते. 1975 साली आंतर राष्ट्रीय महिला दशक जाहीर झाले. त्यातून स्त्री प्रश्नांविषयाचे नवे विचारमंथन सुरू झाले. बदलत्या स्त्री जीवनाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोण मात्र आजही फारसा बदललेला नाही. प्रसार माध्यमांव्दारे स्त्रियांचे अत्यंत हीन आणि विकृत चित्रण केले जाते. याचा नेमका मराठी स्त्री साहित्यावर काय परिणाम झाला तर स्त्रियांची सामाजिक परिस्थिती, स्त्री शिक्षण, दलित, ग्रामीण आणि मुस्लिम या तळागाळातील स्त्रियांच्या समस्या या विषयी लेखन झालेले दिसते.

शिक्षणातील सहभागामुळे किंवा नोकरीच्या निमित्ताने तिला घरापासून दुर राहावे लागते. मैदानी खेळात महिलांची आघाडी, फॅशनमुळे तिच्या पेहरावातील बदल, नोकरी आणि शिक्षणात मुलं-मुली एकत्र येणे, पोलिस आणि सैनिक भरतीत तिला पुरूषांबरोबर स्थान प्राप्त होणे, कोणत्या ही परिक्षेत वरच्या श्रेणीत उत्तीर्ण होणे, प्रसार माध्यमांनी पारंपरिक स्त्रीची संकल्पना बदलवून तिच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला ठळक प्रसिध्दी प्राप्त करून दिली. यातून लिंग विषमता किती मोठ्या प्रमाणात आहे हे दिसून येते. पुरूषांच्या बरोबरीने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार तिला न देता बाई पणाच्या आवरणात तिला बंदिस्त केले जाते म्हणून सिमॉन द बोव्हा म्हणतात, ''बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. नंतर तिला बाई बनवलं जातं''.लहानपणापासूनच मुलीला 'तू आमच्या काहीच कामाची नाही, तू दुसऱ्यांच्याच घरी जाणार आहे' हे बाळकडू तिला पाजण्यात येते व तिचे मानसिक खच्चीकरण सुरू होते. मग ती त्याच मानसिकतेतून प्रत्येक काम करते. सुमती लांडे म्हणतात, ''स्त्री पुरूशांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीमुक्तीचे भारतीय संदर्भ थेट ख्रिस्तपूर्व 10,000 वर्षापासून म्हणजे वेदकाळाच्या ही अलीकडे मातृदेवतांच्या उदयाचा काळ मातृ परंपरा असलेल्या वैदिक काल खंडापासून असावा असा उल्लेख आढळतो. प्रत्येक स्त्रीला समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि समान स्वातंत्र्य मिळावे. पुरूशांच्या वरोवरीने स्त्रीला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समान तत्व लाभावे, तिला रोजगाराच्या सर्व समान संधी उपलब्ध करून दिल्या जाव्या. पण असे होत नाही. स्त्रीला संधी दिली तर ती आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकेल म्हणूनच व्हर्जिनिया वुल्फ म्हणतात, ''तुम्ही लिहा, तुमच्या देहाचा आवाज इतरांना ऐकू गेला पाहिजे. तरच तुमच्या अवोध मनाचा खजाना खुला होऊन सर्वांना पिळवटून टाकेल''.

मलिका अमरशेख आपल्या कवितेत लिंग विषमतेवर प्रकाश टाकताना म्हणतात,

'रजःस्वला, संभोग, बाळंतपण
शरीराभोवती फिरलेलं
आयुष्यासकट माणसाचं चक्र
मुक्या वेदनांचं वाटोळं'
तसेच अनुराधा पाटील म्हणतात,
'रहा उभी तू तुझ्याच चितेवर
आयुष्याचे पुरवित इंधन'

एकीकडे पुरुष स्त्रीला सृष्टीमाता, सृष्टीची जननी, देवी, पुज्यनीय मानतो तर दुसरीकडे स्त्री ही दासी, उपभोग्य वस्तु, कुटुंबाचे पालनपोषण करणारी, पायाची वहाण पायातच बरी अशा प्रकारे विचार करतो.

**निष्कर्ष :**

एकूण पूर्ण विचार करता असे लक्षात येते की, जाती विषमतेचा अंत झाला तर उत्तमच पण तसे घडण्याची शक्यता फारशी दिसत नाही तेव्हा किमान राज्य घटनेने सर्वधर्मसमभाव, धर्म निरपेक्षता, जाती निरपेक्षता ही समतेची तत्वे व सर्व जातीप्रती नम्रतेची व आदरतेची भावना जर प्रत्येक भारतीय व्यक्तीने कायम ठेवली

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

तर जाती विषमतेला मुठमाती देण्यात आपण कदाचित यशस्वी होऊ शकतो ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच फक्त एक शारीरिक वा जैविक बदल जो निसर्ग निर्मित आहे, मनुष्य निर्मित नाही अन्यथा मुलगा मुलगी एक समान हे तत्व जर स्वीकारले, मुलगाच हवा हा दुराग्रह टाळला, मुलगी प्रत्येक गोष्ट कळु शकते अशी विचार सरणी समाजाने पर्यायाने राष्ट्राने परस्परांत प्रस्तुत केली तर लिंग विषमतेला आळा बसू षकतो. महिलांवर समाजात काय, कुटुंबात काय बिनदिक्क्त पणे अत्याचार होत असतात आणि आपण ते निमुटपणे बघत असतो. हे सारं कुठेतरी थांबयलाच हवं त्यासाठी काय करता येईल याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ कधीच निघून गेली आंहे. तरीही 'बेटर लेट दॅन नेव्हर' म्हणतात त्याप्रमाणे आता तरी उपाय योजना व्हायलाच हवी.

***संदर्भ ग्रंथ***


1. *डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि भारतीय जाती समाज- प्राचार्य कांबळे, म. ना.*
2. *मांडवकर, भाऊ 'चातुर्वर्ण्य' प्रकाशक-नलिनी चौधरी, सेवा प्रकाशन, अमरावती,1994*
3. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18, भाग 3, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती 2004*
4. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे, जाती व्यवस्थेचे निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथम 2015*
5. *स्त्रीवाद आणि मराठी साहित्य-डॉ. वंदना महाजन, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 2013*
6. *ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*
7. *अंजलीर पांडे, तरूण भारत, आकांक्षा पुरवणी, शुक्रवार, 3 मार्च 2017*